# * घटक: व्यापार तोल व व्यवहार तोल *

## व्यापारतोल : (Balance of Trade) = BOT

एका वर्षातील देशाच्या आयात वस्तूंची किंमत व निर्यात वस्तूंची किंमत (एकूण) यामधील फरक होय. (यामध्ये सेवांचा समावेश नाही)

व्यापारशेष ⇒ निर्यात आयातीपेक्षा अधिक - अनुकूल

व्यापारतूट ⇒ आयात निर्यातीपेक्षा अधिक - प्रतिकूल

## व्यवहार तोल (Balance of Payment) = BOP

व्यवहारतोलात वस्तू व सेवांच्या देवाणघेवाणीसह सर्व देशांकडून येणारी येणी व सर्व देशांना द्यावी लागणारी देणी म्हणजेच कर्ज व गुंतवणुकीच्या व्यवहारातून निर्माण होणाऱ्या येण्या देण्याचा समावेश होतो.

### व्यवहारतोल रचना ⇒

व्यवहारतोलात चालू खात्यावरील व भांडवली खात्यावरील व्यवहारांचा समावेश

* चालू खाते ⇒ वस्तू व सेवांच्या देवाणघेवाणीचा समावेश
* भांडवली खाते ⇒ कर्ज व गुंतवणुकीच्या व्यवहाराचा समावेश.

* व्यवहार तोलाच्या चालू खात्याचे 1) दृश्य खाते / किंवा व्यापार खाते ⇒ वस्तू
  2) अदृश्य खाते हे भाग. ⇒ सेवा.

### व्यवहारतोल

- चालू खाते
  - दृश्य/व्यापार खाते
    - वस्तूंच्या आयात निर्यातीचे व्यवहार
  - अदृश्य खाते
    - सेवांचे व्यवहार
    - ① सेवांची देवाणघेवाण. उदा. बँकिंग, शिपींग, शिक्षण पर्यटन, पोस्ट, तांत्रिक सेवा.
    - ② परकीय कर्जावरील व्याज व गुंतवणूक यामधून प्राप्त उत्पन्न.
    - ③ ट्रान्स्फर पेमेंट्स - परदेशस्थ भारतीयांनी देशात पाठविलेला पैसा. तसेच नातेवाईक/मित्रांना दिलेले गिफ्टस.
- भांडवली खाते
  - कर्ज व गुंतवणुकीचे व्यवहार.
    - ① बाह्य मदत
    - ② बाह्य वाणिज्यिक कर्जे
    - ③ अल्पकालीन कर्ज
    - ④ बँकिंग भांडवल ठेवी
    - ⑤ परकीय गुंतवणूक
      1) परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक
      2) परकीय अप्रत्यक्ष गुंतवणूक

Scanned by CamScanner

13) आयातीने लोकांच्या उत्पन्नाची पातळी कमी होते.
नियातीने लोकांच्या उत्पन्नाची पातळी वाढते.
) चालू खाते ⟶ दृश्य खात्यावरील ⟶ तूट भरून काढण्यासाठी ⟹ अदृश्य खात्यावरील शेष वापरले
चालू खाते ⟶ तूट ⟶ भांडवली खात्यावरील शेष
मात्र भांडवली खात्यातही तूट असल्यास परकीय चलन साठ्याचा उपयोग.
14) १९९१-९२ पासून अदृश्य खात्यावर शेष आढळून आले आहे.
५) २००१-०२, २००२-०३, २००३-०४ या तीन वर्षांत चालू खात्यात शेष प्राप्त कारण
अदृश्य खात्यावरील शेष दृश्य खात्यावरील तुटीपेक्षा जास्त ठरले होते.
७) भांडवली खात्यावर अनेक वर्षांपासून शेष. २००७-०८ — महत्तम स्तरावर.

## * रुपयाची परिवर्तनीयता *

**परिवर्तनीय चलन :** जेव्हा एखादे चलन इतर देशांच्या चलनात संपूर्णतः मुक्तपणे विनिमयक्षम असते व अशा विनिमयासाठी कोणत्याही प्रकारची सरकारची नियंत्रणे/मर्यादा नसते.
① संख्येवर बंधन नसते ⇒ हव्या तेवढ्या चलनाचा विनिमय करता येतो.
② विनिमय दर सरकार ठरवित नाही - दोन्ही चलनाच्या मागणी-पुरवठ्यावर ठरतो.
③ सर्व वस्तूंना सारखाच दर.

**अंशतः परिवर्तनीय :** परिवर्तनीय व्यवस्थेवर कोणत्याही प्रकारची नियंत्रणे/बंधने टाकली की ती अंशतः परिवर्तनीय होते.
चलन फक्त काही व्यवहारांसाठी मुक्तपणे परिवर्तनीय
उदा. फक्त वस्तूंच्या/सेवांच्या आयात निर्यातीसाठी
उदा. दुहेरी विनिमय दराचा वापर केला जातो.

**अपरिवर्तनीय :** परकीय विनिमय व्यवहारावर बंधने/मर्यादा खूप जास्त असतील.

## * भारतातील सद्यस्थिती *

१) भारतात १९९२ पर्यंत मोठ्या प्रमाणात बंधने: नियंत्रणे FERA कायदा 1973 अंतर्गत.
२) ९२-९३ च्या अर्थसंकल्पात LERMS - (Liberalised Exchange Rate Management System) व्यवस्थेची घोषणा ⟹ दुहेरी विनिमय पद्धत लागू.
निर्यात उत्पन्नाच्या ६०% ⟶ बाजारभाव दराने
४०% ⟶ सरकारी दर - हे RBI ला अधिकृत डिलर्समार्फत विकणे.
सरकारी दर बाजार दरापेक्षा कमी.
३) १९९३-९४ — रुपया व्यापार खात्यावर पूर्ण परिवर्तनीय (दृश्य व्यापारावर - वस्तू)
मार्च ९४ रुपया चालू खात्यावर पूर्ण परिवर्तनीय (दृश्य व अदृश्य व्यापारावर - वस्तू व सेवा)
४) रुपया भांडवली खात्यावर - परिवर्तनीय करण्याबाबत - शिफारस करण्यासाठी
१९९७ - एस.एस. तारापोर समिती -
२००० पर्यंत तीन टप्प्यात रुपया पूर्णतः परिवर्तनीय करण्याची शिफारस.

Scanned by CamScanner

५) १९९७ च्या पूर्व आशियाई संकटामुळे - प्रयत्न रद्द
६) २००६ मध्ये दुसऱ्यांदा एस.एस. तारापोर समिती ⇒ मांडणी स्वाच्यावर रुपयाची पूर्ण परिवर्तनीयता २०१०-११ पर्यंत तीन टप्प्यात लागू करण्याची शिफारस. - पूर्ण अंमलबजावणी नाही.

## * रुपयाचा विनिमय दर *

प्रकार - i) निश्चित किंवा स्थिर ⇒ सरकारने कायद्याने ठरविलेला दर.
ii) तरता किंवा बदलता ⇒ जर विनिमय दर चलनाच्या मागणी व पुरवठ्याच्या परस्पर संयोगाने ठरवला जात असेल तर तो बदलता असतो

## * रुपयाचे अवमूल्यन *

अर्थ: रुपया परकीय चलनाच्या संदर्भात मागणी व पुरवठ्याच्या आधारे स्वस्त होत असल्यास आपण रुपया घसरत आहे असे म्हणतो.
⇒ अवमूल्यनामुळे सुद्धा रुपया स्वस्त होत असतो पण हे अवमूल्यन सरकारने मुद्दाम घडवून आणलेले असते. : रुपयाची किंमत कमी करणे हा उद्देश.

## * अवमूल्यनाचे परिणाम *

आयातीवरील परिणाम - अवमूल्यनामुळे भारत आयात करीत असलेल्या वस्तूंची किंमत भारतात वाढते, आयात महाग झाल्याने आयातीची प्रवृत्ती कमी होते. आयातीचे आकारमान कमी होते.

निर्यातीवरील परिणाम - भारत निर्यात करीत वस्तूंची किंमत परदेशात कमी होते. त्यामुळे परकीय आयातदार भारतीय वस्तूंची अधिक मागणी करतात त्यामुळे निर्यात वाढते.

म्हणजेच अवमूल्यनामुळे व्यापारी तूट कमी होण्यास मदत होते पण त्यासाठी वस्तूंची मागणी मोठ्या प्रमाणात लवचिक असावी लागते (उदा. इंधन गरजेच्या वस्तूवर याचा विशेष परिणाम होणार नाही)

## * अवमूल्यनाचे प्रयोग *

① २६ सप्टें १९४९ ⇒ अमेरिकन डॉलरच्या तुलनेत **30.5% नी**
⇒ पाऊंड स्टर्लिंग संदर्भात —— अवमूल्यन नाही.
⇒ एका रुपयाची डॉलरमधील किंमत - ३०.२ सेंटस वरून २१ सेंट्स पर्यंत (1$ = 100 सेंटस)
⇒ या अवमूल्यनामुळे भारताची व्यापारतूट कमी झाली.
⇒ तत्कालीन अर्थमंत्री ⇒ जॉन मथाई

② ६ जून १९६६ ⇒ अमेरिकन डॉलर व इतर युरोपियन चलनाच्या संदर्भात - **36.5%**
⇒ रुपयाचा विनिमय दर ४.७६ रु प्रति डॉलर वरून ७.५० रु प्रति डॉलर
⇒ या अवमूल्यनामुळे निर्यात वाढली पण अन्नधान्य आयातीमुळे व्यापारी तूट कमी झाली नाही. (दुष्काळ)
⇒ अर्थमंत्री - सचिन चौधरी

Scanned by CamScanner

३) १९९१ - तीन टप्प्यात :- १ जुलै = ९.५%
३ जुलै = १० ते १०.७८ %
१५ जुलै - २%
} एकूण २०% नी

⇒ डॉलर, पाऊंड, मार्क, येन, फ्रॅन्क इ. संदर्भात
⇒ अर्थमंत्री - डॉ मनमोहन सिंग.

## * भारताचा परकीय चलन साठा *
## (Foreign Exchange Reserves in India)

देशाच्या परकीय चलन साठ्यात खालील बाबींचा समावेश -

1) RBI कडील परकीय चलन मालमत्ता
2) RBI कडील सोन्याचा साठा
3) SDRs (Special Drawing Rights)
4) IMF कडील आरक्षित निधी

RBI कडील चलन मालमत्ता अमेरिकन डॉलर, युरो, पाऊंड, ऑस्ट्रेलियन डॉलर, येन यासारख्या प्रमुख चलनात ठेवली जाते. मात्र परकीय चलन साठा केवळ अमेरिकन डॉलर मध्ये मोजला जातो व व्यक्त केला जातो.

⇒ भारताचा परकीय चलन साठा ⇒

| | | |
|---|---|---|
| मार्च १९९१ ⟶ | ५.८ अब्ज डॉलर | |
| डिसे २००३ ⟶ | १०० —॥— | |
| एप्रिल २००७ ⟶ | २०० —॥— | |
| फेब्रु २००८ ⟶ | ३०० —॥— | |
| मे २००८ ⟶ | ३१४.६ —॥— | |
| डिसे २००९ ⟶ | ३२३.६४ —॥— | (आतापर्यंत सर्वाधिक) |
| २०१३-१४ ⟶ | ३०४.२ —॥— | (+12.2) |
| २०१४-१५ ⟶ | ३४३ —॥— | (+16.3) |
| २०१५-१६ ⟶ | ३५९.८ —॥— | (+16.7) |

भारत जगातील ५ व्या क्रमांकाचा परकीय चलनसाठा असणारा देश (युरोझोन व हाँगकाँग वगळून)
① चीन
② जपान
③ स्वित्झर्लंड
④ सौदी अरेबिया

## IMF कडून सोने खरेदी

⇒ सप्टे २००९ मध्ये IMF ने बिलीय संजाधने वाढविण्यासाठी ४०३.३ टन सोने विक्री निर्णय
⇒ डिसे २००९ मध्ये RBI ने ६.७ अब्ज डॉलर्स रक्कम खर्च करून २०० टन सोने खरेदी.
⇒ RBI कडील साठा ३५७.८ टनावरून ५५७.८ टनावर झाला.
⇒ जगातील १० व्या क्रमांकाचा सोने धारण करणारा देश.

# * परकीय भांडवल *

परकीय भांडवल

- खाजगी परकीय भांडवल
  - परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक (FDI)
  - परकीय अप्रत्यक्ष गुंतवणूक
    - i) FIIS.
    - ii) ADR's
    - iii) GDR's
- सार्वजनिक परकीय भांडवल.
  - बायलॅटरल हार्ड लोन्स
  - बायलॅटरल सॉफ्ट लोन्स
  - मल्टिलॅटरल सॉफ्ट लोन्स

## (1) खाजगी परकीय भांडवल :

### (1) परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक :- (Foreign Direct Investment)

⇒ ही गुंतवणूक भारतात प्रकल्प व मशीनरी निर्माण करण्यासाठी वापरण्यात येते.

⇒ अशा मालमत्तेवर गुंतवणूक दाराची कायदेशीर मालकी तयार होते.

स्वरूप ⇒ अ) परकीय कंपनीची शाखा किंवा संलग्न संस्था स्थापन करून. (स्वतंत्र)

ब) भारतीय कंपनीबरोबर भागिदारी करून - त्यासाठी त्यांना (भागीदारीत) कंपनीचे किमान 10% शेअर्स विकत घ्यावे लागतात.

### (2) परकीय अप्रत्यक्ष गुंतवणूक: (Foreign Indirect Investment)

या गुंतवणूकीला पोर्टफोलिओ गुंतवणूक किंवा रेनटियर गुंतवणूक म्हणतात.

कारण: ही गुंतवणूक कंपन्यांच्या रोख्यामध्ये केलेली असते.

⇒ अशा रोख्यांना भारत सरकारची हमी असते.

⇒ उद्योगावर मात्र नियंत्रण किंवा मालकी निर्माण होत नाही.

⇒ मात्र लाभांश प्राप्त होतो.

अप्रत्यक्ष गुंतवणूकीत

1) परकीय संस्थात्मक गुंतवणूक :- (Foreign Institutional Investment)

→ असा दर्जा परकीय गुंतवणूक वित्तीय संस्थांना RBI मार्फत दिला जातो.

→ त्यानुसार या संस्था रोख्यांमध्ये गुंतवणूक करतात

→ मालकी हक्क नाही - 10% पेक्षा अधिक शेअर्स विकत घेवू शकत नाही.

ii) पात्र परकीय गुंतवणूकदार (Qualified Foreign Investor)

→ 2011-12 पासून परदेशी पात्र व्यक्तीनाही रोखे बाजारात गुंतवणूक करता येते.

iii) परकीय पोर्टफोलिओ गुंतवणूक - (Foreign Portfolio Investment)

जून 2014 मध्ये RBI ने FIIs, Sub Acounts, QFIs एकत्रित करून FPI's हा वर्ग निर्माण केला

iv) ADR's (Americal Depository Reciept) व GDR's (Global Depository Reciept)

ह्याच्याने भारतीय कंपन्यांना परदेशी भांडवल बाजारातून भांडवल उभारणी करता येते.

Scanned by CamScanner

## सार्वजनिक परकीय भांडवल

⇒ हे भांडवल कर्ज व अनुदानाच्या स्वरूपात :

i) द्विपक्षीय कर्ज : एखाद्या देशाकडून विशिष्ट व्याजदराने घेतलेले कर्ज.

ii) द्विपक्षीय सुलभ कर्ज : पैशा व्यतिरिक्त स्वरूपात घेतलेले कर्ज

iii) बहुपक्षीय कर्ज : बहुराष्ट्रीय संस्थांनी दिलेली कर्जे उदा. Aid India club, जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय वित्त महामंडळ, राष्ट्रसंघ विकास कार्यक्रम (UNDP), ABD इ.

- **विदेशी मदत** : विविध संस्थांकडून विकसनशील राष्ट्रांना कर्जे व अनुदानाच्या स्वरूपात प्राप्त होणाऱ्या सार्वजनिक परकीय भांडवलाला विदेशी मदत म्हणतात. कर्जे व्याजरहीत किंवा अल्प व्याज दरावर दिली जातात.

1) बंधनयुक्त मदत ⟶ जेव्हा ही मदत काही अटींवर आधारीत असते ------

अटी. अ) ऋणको देशाने घेतलेल्या कर्जाचा वापर धनको देशातील वस्तू व सेवा विकत घेण्यासाठी करावा.

ब) धनको देशाने निर्देशित केलेल्या प्रकल्पामध्येच कर्जाचा वापर करावा.

2) बंधनमुक्त मदत ⟶ यामध्ये मदतीची सांगड विशिष्ट उद्दिष्ट, कार्ये किंवा प्रकल्पाशी स्पष्टपणे किंवा प्रच्छन्नपणे घातली जात नाही ------

अ) अटी असल्या तरी सौम्य असतात.

ब) ऋणको देशाच्या आर्थिक सार्वभौमत्वाला कोणतीही बाधा पोहचत नाही.

## * भारतातील परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक *
## (FDI in India)

परकीय गुंतवणुकीची संमती व्यवस्था :

1) **Automatic Route** ⇒ 100% पर्यंत FDI - संमती

⇒ भारत सरकार किंवा RBI च्या पूर्वसंमतीची आवश्यकता नसते.

⇒ मात्र 30 दिवसांच्या आत (गुंतवणूक स्थापनेनंतर) RBI च्या संबंधित विभागास सूचना देऊन कागदपत्रांची पूर्तता करणे बंधनकारक.

2) **Government Approval Route**

⇒ ज्या क्षेत्रामध्ये Automatic Route संमत नाही अशा क्षेत्रामध्ये गुंतवणुकीसाठी.

⇒ सरकारच्या पूर्व संमतीची आवश्यकता.

⇒ त्यासाठी परकीय गुंतवणूक प्रवर्तन मंडळ (Foreign Investment Promotion Board) FIPB ⇒ स्थापन.

⇒ 5000 कोटीपेक्षा कमी गुंतवणुकीचा प्रस्ताव ⇒ वाणिज्य मंत्र्यामार्फत परवानगी

5000 कोटी पेक्षा जास्त ⟶ पंतप्रधानांच्या नेतृत्वाखालील आर्थिक कामकाज कॅबिनेट कमिटी मार्फत.

Scanned by CamScanner

## FDI चे विश्लेषण : क्षेत्रनिहाय / राष्ट्रनिहाय / राज्यनिहाय विभागणी.

मार्च २०१६
① ②

**क्षेत्र निहाय** ⇒ २००० ते २०१६ ⇒ सर्वाधिक FDI सेवा क्षेत्रात :⇒ त्यानंतर बांधकाम, कॉम्प्युटर सॉफ्टवेअर हार्डवेअर व दूरसंचार क्षेत्र.

२०१५ व १६ मध्ये – सेवा क्षेत्र ⇒ त्यानंतर कॉम्प्युटर सॉफ्टवेअर व हार्डवेअर.

**राष्ट्रनिहाय** : २००० ते २०१६ ⇒ सर्वाधिक गुंतवणूक

| | |
|---|---|
| मॉरिशस = | ३३ %. |
| सिंगापूर | १५ %. |
| इंग्लंड | ०८ %. |
| जपान | ०८ %. |

**राज्यनिहाय** → २००० ते २०१६ ⇒ सर्वाधिक गुंतवणूक
1) मुंबई प्रक्षेत्रात (मुंबई, दमन व दीव दादरा व नगर हवेली)
2) नवी दिल्ली
3) चेन्नई

## * विविध क्षेत्रातील FDI मर्यादा :

**प्रतिबंधीत क्षेत्र** ⟶
1) लॉटरी व्यवसाय (सरकारी तसेच खाजगी)
2) जुगार व सट्टेबाजी
3) चिट फंड्स -
4) निधी कंपन्या
5) टी डी आर यांचा व्यापार
6) रिअल इस्टेट व्यवसाय किंवा फार्म हाऊसचे बांधकाम. (टाऊनशिप विकास, निवासी व व्यापारी संकुले, रस्ते व पूल इ. वगळून)
7) तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ.
8) खाजगी गुंतवणूकीस खुली नसलेली क्षेत्रे उदा. i) अणुऊर्जा ii) रेल्वे ऑपरेशन्स इ.

काही क्षेत्रात २०, २६, ४९, ५१, ७४ व १००% पर्यंत FDI ला संमती असते.

## ** भारतावरील परकीय कर्ज **

⇒ परकीय कर्जाचे आकडे दर ३ महिन्यांनी प्रकाशित

१ ली व ४ थी तिमाही ⟶ RBI मार्फत
२ री व ३ री –॥– ⟶ वित्त मंत्रालयामार्फत.

परकीय कर्ज = मार्च २०१६ = ४८५.६ अब्ज $
मार्च २०१५ = ४७५.० अब्ज $

वाढ १०.६ अब्ज $

मार्च २०१६ च्या शेवटी परकीय कर्जाची चलननिहाय विभागणी.
① अमेरिकन डॉलर (५८.१%)
② भारतीय रुपया (२८.३%)
③ SDR's (५.८%)
④ जपानी येन (४.४%)
⑤ अवशिष्ट युरो व पाऊंड.

⇒ परकीय कर्जाची वैशिष्ट्ये:
1) मार्च २०१६ = ४८५.६ अब्ज डॉलर ⟶ GDP च्या २३.७%
2) एकूण पैकी ⇒ ८३.४ अब्ज डॉलर ⇒ अल्पकालीन ⇒ १७.२%
४०२.२ —॥— ⇒ दीर्घकालीन ⇒ ८२.८%.
3) अल्पकालीन कर्जाचे परकीय चलन साठ्याशी प्रमाण ⇒ २३.२%
4) देशाच्या परकीय चलन साठ्याचे एकूण परकीय कर्जाशी असलेले प्रमाण.
२००१ ⟶ ११२.१% } प्रमाण १००% पेक्षा कमी असलेल्यास परकीय साठ्यापेक्षा कर्ज अधिक असते.
२०१६ ⟶ ७४.२% } प्रमाण १००% पेक्षा अधिक असल्यास —॥— कर्ज कमी असते.
5) एकूण परकीय कर्जापैकी ⟶ सरकारी कर्ज ⇒ प्रमाण २०१६ = १९.२३%.
गैर-सरकारी कर्ज ⇒ —॥— ८०.७७%.
परकीय कर्जात - सरकारी कर्जाचे प्रमाण कमी तर गैर सरकारी कर्जाचे प्रमाण अधिक होत आहे.
सरकारी कर्जात ⇒ द्विपक्षीय कर्जाचा समावेश: दर कमी - परतफेडीचा कालावधी जास्त
तर गैर सरकारी कर्जात ⇒ बहुपक्षीय कर्जाचा समावेश: दर जास्त - —॥— कमी.

→ महाराष्ट्रावरील कर्ज
२००२-०३ ⟶ ८२,५४९ कोटी
२०१५-१६ ⟶ ३,३३,९६० —॥—
एकूण कर्जाचे स्थूल राज्य उत्पादाशी प्रमाण ⇒ २००६-०७ = २२.९%
२०१५-१६ = १६.९%

FERA व FEMA कायदे:

FERA = Foreign Exchange Regulation Act. -1973
FEMA - Foreign Exchange Management Act. -1999.

पहिला FERA कायदा -1947 - परकीय कंपन्यांच्या व्यवहारांचे नियंत्रण.
यामध्ये बदल करून FERA -1973 ⟶ लागू झाले 1974 = भारतातील मर्यादित परकीय चलन साठ्याचे संवर्धन करणे हा हेतू.
FEMA - FERA मध्ये बदल करून FEMA घोषित ⇒ १९९७-९८ च्या बजेट मध्ये
डिसें १९९९ ला संमत व जून २००० पासून लागू

## FERA 1973 मधील काही तरतुदी :

① परकीय गैरवित्तीय संस्था किंवा परकीय उद्योगांना भारतात व्यवसाय करण्यासाठी RBI ची परवानगी घेणे बंधनकारक.- कलम 29 नुसार

② गैरव्यवहार केल्यास त्याला अटक करण्याचे अधिकार.

③ फौजदारी गुन्हा दाखल करण्याची तरतुद.

④ 1977 मध्ये कोका कोला कंपनीवर या कायद्याने बंदी घालण्यात आली.

⑤

## FEMA - 1999 मधील तरतुदी :

① FERA मधील कलम 29 रद्द करण्यात आले.

② परकीय व्यवहारावरील नियंत्रण शिथिल. नियंत्रणा ऐवजी व्यवस्थापनाचा निर्णय.

③ व्यवहारतोलाच्या चालू खात्यावरील (म्हणजे वस्तु व सेवांच्या म्हणजेच दृश्य व अदृश्य) व्यवहारावर परकीय चलनाच्या देवाणघेवाणीस पूर्ण परवानगी देण्यात आली.

④ भांडवली खात्यावरील व्यवहारावर विशिष्ट मर्यादेपर्यंत परवानगी.

⑤ एखाद्या भारतीयाने परदेशात कमावलेले परकीय चलन तसेच एखाद्या परकीयाने भारतात कमावलेले भारतीय चलन सोबत नेण्यास परवानगी देण्यात आली.

⑥ FEMA कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यावर दिवाणी दावा दाखल होतो. जोपर्यंत दोष सिद्ध होत नाही आरोपीला निर्दोष समजले जाते. अपराध्याला फक्त दंड आकारला जातो अटक करता येत नाही.